
# शिकणे आमचे गमतीचे

## मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग

पालकांनी
मुलांसोबत भाषा
आणि गणित विषयाचे घरी
घ्यावयाचे उपक्रम





# शिकणे आमचे गमतीचे

## मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग

पालकांनी
मुलांसोबत भाषा
आणि गणित विषयाचे घरी
घ्यावयाचे उपक्रम

**शिकणे आमचे गमतीचे**
२०२३

**प्रकाशक:**
ग्यानप्रकाश फाउंडेशन
ब्रम्हनाद, बंगला क्र. १९,
सिंध कोऑपरेटिव सोसायटी,
बाणेर रोड, औंध, पुणे – ४११००७

**मांडणी व मुद्रण:**
सुमा
sumapune2021@gmail.com

# प्रस्तावना

शाळेत जायच्या आधी मुलाला काय येत असते? मुल स्वतःचे नाव ओळखते, हात, पाय डोळे दाखवते, पालकांना ओळखते, घरातील माणसांची नावे, स्वतःच्या आवडीनिवडी, खाऊचे पदार्थ, परिसरातले प्राणी पक्षी कितीतरी गोष्टी त्याला माहित असतात. हे सगळे मुल कुठून शिकते? जग समजून घेताना पालक, नातेवाईक, शेजारी यांच्याशी होणाऱ्या अखंड संवादातून शिकण्याची प्रक्रिया आपोआप सुरु झालेली असते. पण एकदा मुल शाळेत जाऊ लागले की, त्याच्या शिकण्याची जबाबदारी फक्त शाळा आणि शिक्षक यांची असे तर आपल्याला वाटत नाही ना? खरेतर प्रत्येक पालकाला आपल्या मुलाची खूप प्रगती व्हावी असे वाटत असते, त्याच्यासाठी पालक खूप धडपड पण करतात. पण मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत कसे सहभागी व्हायचे यासाठी त्यांना थोडी मदत हवी असते. शिक्षण ही फक्त शाळेत चार भिंतींच्या आत होणारी प्रक्रिया नाही तर सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया जास्तीत जास्त आनंददायी होण्यासाठी, त्याला गती येण्यासाठी पालक म्हणून आपण काय करू शकतो? तर घरी अनौपचारिक वातावरणात मुलांसोबत गप्पा मारून, प्रश्न विचारून, त्यांना वेगवेगळ्या कृती करायला लावून, मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत पालक सक्रीय सहभाग घेऊ शकतात. मुलांसोबत गप्पा मारण्याची, त्यांची मते जाणून घेण्याची, त्यांच्या सोबत छोटे छोटे उपक्रम करण्याची प्रक्रिया मुले आणि पालक या दोघांनाही आनंद देणारी आणि समृद्ध करणारी असते. मुलाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत पालक महत्त्वाचे भागीदार आहेतच परंतु कोविड महामारीसारख्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये ही जबाबदारी किती पटीने वाढते हे आपण अलीकडेच अनुभवले आहे. गावातील प्रत्येक मुल सातत्याने शिक्षण प्रवाहात टिकून राहावे यासाठी गावपातळीवर ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती यांची खूप महत्त्वाची भूमिका आणि जबाबदारी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत निपुण भारत अभियानाद्वारे ३ ते ९ वयोगटातील मुलांना पायाभूत वाचन आणि संख्याज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शासन प्रयत्न करत आहे. आपण सर्व एकत्रितरित्या यामधे योगदान देऊ शकतो. त्यासाठी हे सर्व भागीदार नेमके काय करू शकतात याचा विचार या पुस्तिकेच्या माध्यमातून केलेला आहे.

या पुस्तिकेत पालक मुलांसोबत घरी घेऊ शकतील अशा उपक्रमांचा समावेश आहे. यामध्ये इयत्तेनुसार भाषा आणि गणित विषयांचे नमुन्यादाखल १०–१० उपक्रम

देण्यात आले आहेत. ही उदाहरणे बघा आणि यानुसार तुम्हाला अजून नवीन उपक्रम सूचतात का हे पहा. हे उपक्रम तुम्ही बोलीभाषेत पण घेऊ शकता.

चला तर मग मुलांच्या शिकण्याच्या आनंददायी प्रक्रियेत आपणही उत्साहाने सहभागी होऊया.

**ग्रामपंचायत**

मुलांना लहान लहान अभ्यास गटात काम करण्यासाठी गावातील समाजमंदिर, सभागृह इ. उपलब्ध करून देणे.

गावातील वाचनालयाची पुस्तके मुलांना वाचनासाठी उपलब्ध करून देणे

गावातील स्थानिक ज्ञानसंपदा – संगीत, खेळ, कला, गायन या अनुषंगाने मुलांना अनुभव देण्यासाठी नियोजन करणे.

**शाळा व्यवस्थापन समिती**

गावांमध्ये अभ्यासगटांची स्थापना करून अभ्यासगट कार्यान्वित राहतील हे पाहणे.

अभ्यास गटांमध्ये गावातील शिक्षणमित्र, विषयमित्र यांच्या माध्यमातून गट सक्रीय ठेवणे.

कृतीशील, उत्साही पालकांच्या माध्यमातून सर्व पालकांसोबत मुलांच्या शिक्षणाबाबत चर्चा घडवून आणणे.

अभ्यासगट मित्र आणि शिक्षक यांच्यात समन्वय ठेवणे.

**पालक**

घरी मुलांसोबत शाळेत झालेल्या गोष्टींबाबत गप्पा मारणे.

घरात मुलांना वेगवेगळ्या कृती करायला देणे ज्यातून त्यांच्या वेगवेगळ्या क्षमता विकसित व्हायला मदत होईल.

मुलांसोबत कृतींमध्ये स्वतः सहभागी होणे.

मुलांनी घरी केलेल्या कृती, संवाद  संदर्भात शिक्षकांसोबत चर्चा करणे.  घरी काही प्रात्यक्षिक केलेले असेल तर ते दाखवणे.

| पूर्व प्राथमिक गट – भाषा | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम/ कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे?** |
| १ | मी कोण, तू कोण? स्वत:चे नाव व घरातील इतरांची नावे सांगायला सांगणे. | घरातील सर्वांचे फोटो | संवाद साधणे |
| २ | गाणी स्वतः म्हणणे व आपल्या मागे मुलाला म्हणण्यास प्रोत्साहन देणे. | आवाजाच्या वस्तू (ताट–चमचा, टाळ,घंटी, घुंगरू) | मुलांच्या शब्द संपत्तीत वाढ, ऐकून म्हणणे |
| ३ | वर्तमान पत्रातील, मासिकातील चित्र दाखवून गप्पा मारणे. | वर्तमानपत्रातील, मासिकातील चित्रे | मुलांच्या शब्द संपत्तीत वाढ, स्वतः हून बोलण्यास प्रोत्साहन |
| ४ | परिसरातील प्राणी दाखवणे आणि त्याविषयी माहिती देणे. | परिसरातील प्राणी जसे गाय, कुत्रा | आजूबाजूच्या परिसरातील प्राण्यांची ओळख |
| ५ | स्वयंपाक घरातील वस्तूंची ओळख करून देणे. | स्वयंपाक घरातील वस्तू | वस्तूंचा परिचय, उच्चार स्पष्ट समजणे |
| ६ | कोण काय घालते? घरातील कपड्यांची नावे सांगायला सांगणे. | घरातील कपडे किंवा कपड्यांची चित्रे | संवाद कौशल्य विकसित होणे |
| ७ | कोणत्याही ४ ते ५ वस्तू घेऊन त्यांची माहिती (रंग, आकार) सांगणे. | बाटली, पेन, कागद, भिंगरी, छत्री, चावी, इ. | मुलांच्या शब्द संपत्तीत वाढ, वस्तूंचा परिचय, उच्चार स्पष्ट समजणे |
| ८ | स्वतःच्या अवयवांची ओळख करून देणे. | मुलगा मुलगी यांचे फोटो | मुलांच्या शब्द संपत्तीत वाढ, वस्तूंचा परिचय, उच्चार स्पष्ट समजणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | परिसरातील झाडे व त्यांचे अवयव यांची माहिती देणे. | आजूबाजूची वेगवेगळ्या रंगाची, आकाराची फुले, फळे, पाने | शब्द संपत्तीत वाढ व परिसराची ओळख |
| १० | मुलाला घरातील एखाद्या पदार्थाची चव घेण्यास व त्याबद्दल माहिती देण्यास सांगणे. | घरात नेहमी करण्यात येणारा एखादा पदार्थ | स्वतः बोलण्यास प्रेरणा मिळेल |
| ११ | एखादी वस्तू दाखवून तिचा उपयोग कशासाठी होतो ते सांगायला सांगणे | टोपी, चष्मा, ओढणी, पिशवी, इ. | संवाद कौशल्य |
| १२ | एखादी सारख्या रंगाची वस्तू शोधायला लावणे | पिवळ्या रंगाच्या वस्तू – कपडे, हळद,लिंबू | रंग ओळखणे. |
| १३ | पहिला आवाज ओळखून त्या आवाजांनी नाव सुरु होणाऱ्या वस्तू आपल्या घरामध्ये शोधणे. | जसे च वरून चमचा, चाळणी | शब्द संपत्तीत वाढ व स्मरणशक्ती |
| १४ | चित्र काढण्यास सांगणे व त्यावर चर्चा करणे. | कागद, तेल – खडू | वाक्य रचना |
| १५ | पदार्थ बनविण्याच्या प्रकिया आधी काय केले, मग काय केले | पदार्थ बनविण्याचे साहित्य | पदार्थ बनविण्याचा सुसंगत क्रम लावता येणे |






| पूर्व प्राथमिक गट – गणित | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उप क्रम/ कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे?** |
| १ | कुठल्या गटात एक व कुठल्या गटात अनेक वस्तू आहेत ते नुसते पाहूनही सांगता येणे. | घरातील एक व अनेक वस्तूंचे संच जसे एक व अनेक कप, एक व अनेक ग्लास | दृश्यमान तुलना – एक अनेक |
| २ | कुठल्या गटात कमी व कुठल्या गटात जास्त वस्तू आहेत ते नुसते पाहूनही सांगता येणे, च्या पेक्षा जास्त आणि च्या पेक्षा कमी अशा भाषेत वस्तुसंचाचे वर्णन करण्यास सांगणे. | घरातील कमी व जास्त वस्तूंचे संच जसे एका वाटीत कमी मटार व जास्त मटार, एका वाटीत कमी साखर व जास्त साखर | दृश्यमान तुलना – कमी जास्त |
| ३ | आकारमानानुसार वस्तूंची तुलना करता येणे,पेक्षा लहान, पेक्षा मोठा या भाषेत वर्णन करण्यास सांगणे. | घरातील लहान व मोठ्या वस्तू वाट्या, चमचे, डब्बे, इ. | दृश्यमान तुलना – आकारमान |
| ४ | उंचीनुसार वस्तूंची तुलना करता येणे, पेक्षा उंच, पेक्षा बुटका या भाषेत वर्णन करता येणे. | घरातील उंच व बुटक्या वस्तू– जसे, उंच व बुटकी बाटली, उंच व बुटके स्टूल | दृश्यमान तुलना – उंची |
| ५ | लांबीनुसार वस्तूंची तुलना करता येणे, पेक्षा लांब, पेक्षा आखूड या भाषेत वर्णन करता येणे. | घरातील लांब व आखूड वस्तू, लांब शेवग्याची शेंग आखूड शेंग, लांब आणि आखूड गळ्यातील माळ | दृश्यमान तुलना – लांबी |
| ६ | १ त १० अंक ओळखू शकणे. | कॅलेंडरवरील अंक | १ ते १० अंकाची ओळख होणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | एकेका गुणधर्मानुसार वस्तूंचे वर्गीकरण करता येणे (रंग, आकार, आकारमान, प्रमाण) | **१)** एकत्र असलेल्या कोणत्याही ४ भाज्या, वेगळ्या करणे<br>**२)** ४ वेगवेगळ्या रंगाच्या प्रत्येकी ५/६ वस्तू (उदा. निळा रंग– तेल बाटली, कपडे धुवायचा साबण, पेन लाल रंग– शिप काड्यापेटी, लाल कपडा, लाल फुल, टिकली पाकीट) | वस्तू वर्गीकरण व गट वेगळे करता येणे |
| ८ | मुलभूत आकाराच्या वस्तू ओळखून त्याची नावे सांगता येणे. आकाराप्रमाणे वस्तूंचे वर्गीकरण करता येणे. | घरातील गोल, त्रिकोणी आणि चौकोनी आकाराच्या वस्तू (प्रत्येक आकाराच्या ३ ते ४ वस्तू) जसे गोल– ताटली, नाणे, बांगडी, वाटी, चेंडू | आकार ओळखणे |
| ९ | १ ते १० पर्यंतच्या वस्तू मोजू शकणे आणि किती आहेत ते सांगू शकणे. | घरातील एकसारख्या दिसणाऱ्या ५ वस्तू– जसे की, ५ पुस्तके, ५ बाटल्या, ५ चमचे | १ ते १० वस्तूंची मोजणी करता येणे |
| १० | ३ ते ४ वस्तूंचा पॅटर्न ओळखून त्याप्रमाणे पुढे काय येईल हे ओळखून पॅटर्न पूर्ण करता येणे. जसे की २ पाने, १ फूल, २ पाने, १ फूल, .....<br>१ चमचा, २ वाट्या, २ चमचे, १ चमचा, २ वाट्या, २ चमचे,...... | पाने, फुले | पॅटर्न ओळखणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | वस्तुंचे अवकाशातील स्थान ओळखता येणे म्हणजेच एखादी वस्तू आत की बाहेर/ वर की खाली/पूढे की मागे हे समजणे. | कपडे कपाटाच्या आत की बाहेर/ एखादी वाटी टेबलावर की टेबलाखाली | अवकाशीय संबोध |
| १२ | ४ ते ५ तुकड्यांचे चित्र कोडे लावता येणे. | एखादे वर्तमानपत्रात आलेले मोठे चित्र ४ तुकड्यांमध्ये कापून ठेवणे. | चित्र कोडे लावता येणे |
| १३ | वस्तूंच्या गटातील वेगळी दिसणारी किंवा गुणधर्माने/कार्याने वेगळी असणारी वस्तू ओळखता येणे. | वेगवेगळ्या रंगाचे मणी, फुले इ. | वेगळी वस्तू ओळखता येणे |
| १४ | १ ते १० अंकचिन्ह ओळखून तेवढ्या वस्तूंशी जोडी लावता येणे. | घरातील कुठल्याही १ ते १० वस्तूंचे संच आणि १ ते १० अंक कार्डे | १ ते १० संख्या ओळखणे व त्यांच्या जोड्या लावता येणे |
| १५ | दिलेल्या सुचनेनुसार वस्तू क्रमाने लावता येणे.<br>**१)** सर्वात लांब ते सर्वात आखूड आणि सर्वात आखूड ते सर्वात लांब<br>**२)** सर्वात उंच ते सर्वात बुटका आणि सर्वात बुटका ते सर्वात उंच<br>**३)** सर्वात लहान ते सर्वात मोठा आणि सर्वात मोठा ते सर्वात लहान | **१)** वेगवेगळ्या लांबीचे ४ चमचे, वेगवेगळ्या लांबीच्या झाडाच्या काड्या<br>**२)** वेगवेगळ्या उंचीच्या बाटल्या, वेगवेगळ्या उंचीचे ग्लास<br>**३)** घरातील सारख्या दिसणाऱ्या पण आकाराने लहान मोठ्या असणाऱ्या ३ वस्तूंचा संच, फळीवरचे डबे, एकात एक जाणारी पातेली | वस्तू क्रमाने लावणे–<br>१. लांबी<br>२. उंची<br>३. आकारमान |

| इयत्ता पहिली – भाषा | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | कोणतेही चित्र दाखवून त्यातील १० शब्द सांगायला सांगा. | पुस्तक, वर्तमानपत्र, गोष्टीच पुस्तक | चित्र वाचन, चित्र ओळख |
| २ | कागदावर मुळाक्षरे लिहून वाचायला सांगा– कोणतीही ५ | कागद, पेन | अक्षर ओळख |
| ३ | मुलाच्या आवडीचे चित्र काढायला सांगा व रंगवायला सांगा, आता या चित्रात त्याने काय काढलेले आहे हे त्याला सांगायला सांगा. | कागद, पेन्सिल/ पेन, खडू रंग | मुलाने जे चित्र काढले आहे ते काय काढले आहे सांगता येणे |
| ४ | मुलाला कोणतेही गाणे किंवा बडबडगीत म्हणायला सांगा. | – | गाणे म्हणणे, चालीत म्हणणे |
| ५ | मुलाला वेगवेगळ्या प्राण्यांचे/पक्ष्यांचे आवाज काढायला सांगा किंवा तुम्ही काढा व त्यांना ओळखायला सांगा. | – | प्राणी/ पक्ष्यांचे आवाज काढायला व ओळखायला शिकणे |
| ६ | फरशीवर मुलाला एखादे अक्षर, अंक काढून द्या व त्यावर बिया/खडे मांडायला सांगा. (आपण ज्याप्रकारे अक्षर लिहितो त्या वळणाने बिया/ खडे मांडायला सांगा) | बिया, खडे, खडू | अक्षराचे वळण समजणे |
| ७ | कोणत्याही अक्षरावरून मुलाला ५ शब्द सांगायला सांगा.<br>उदा– क– कप, कागद, म– मी, मला याप्रमाणे अक्षरावरून मुलाला त्याच्या समजेप्रमाण शब्द सांगू द्या. | – | मुलाची शब्द संग्रह वाढण्यास मदत |
| ८ | मुलाला तुझ्या घरात कोण कोण राहते हे विचारा/ सर्वांची नावे सांगायला सांगा. | – | घरातील व्यक्तींचा परिचय |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | सकाळी उठल्यापासून तू काय केलेस हे मुलाला सांगायला सांगा. | – | घटनाक्रम |
| १० | छोट्या छोट्या डब्यांमध्ये तांदूळ, डाळ, शेंगदाणे यासारखे साहित्य भरा व कशाचा आवाज आहे हे मुलाला ओळखायला सांगा (डबी चिकटपट्टीने झाकून द्यावी आतील साहित्य दिसू नये ही काळजी घ्यावी) | डाळ, तांदूळ, शेंगदाणे, खडे, मीठ, साबुदाणा यासारखे घरातले काहीही साहित्य घेऊ शकता, डब्या, चिकटपट्टी | विविध वस्तूंचे अचूक आवाज ओळखणे |











| इयत्ता पहिली – गणित | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | घरातील गोल आकाराच्या वस्तूंची नावे सांगायला सांगा. | – | गोल आकाराची ओळख |
| २ | घरातील त्रिकोणी आकाराच्या वस्तूंची नावे सांगायला सांगा. | – | त्रिकोण आकाराची ओळख |
| ३ | घरातील चौकोनी आकाराच्या वस्तूंची नावे सांगायला सांगा. | – | चौकोन आकाराची ओळख |
| ४ | १ ते ९ पैकी कोणतेही अंक फरशीवर काढून द्या. त्यावर खडे, बिया मांडायला मुलाला सांगा. | बिया, खडू, खडे | अंक ओळख व वळण |
| ५ | १ ते ९ या संख्यांपैकी कोणत्याही संख्या सांगा व तेवढ्या वस्तू (चमचे, वाट्या, बिया, खडे) मोजून द्यायला मुलाला सांगा. | चमचे, वाट्या, बिया, खडे याप्रमाणे घरातील काहीही वस्तू | मोजणी |
| ६ | लहान ताट – मोठे ताट, लहान वाटी – मोठी वाटी, लहान पातेले – मोठे पातेले हे मुलाला हातात घेऊन दाखवायला सांगा | घरातील एकसारख्या लहान/मोठ्या आकाराच्या वस्तू | लहान – मोठा संकल्पना |
| ७ | सूचनांचा खेळ– मुलांना काही सूचना सांगा त्याप्रमाणे त्यांना कृती करायला सांगा **उदा –**<br>**१.** कपाटाच्या मागे झाडू ठेव<br>**२.** दप्तरातून पुस्तक बाहेर काढ व जमिनीवर ठेव<br>**३.** दप्तरातील वह्या/पुस्तके एकावर एक मांडून ठेव | – | श्रवण कौशल्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | घरातील वेगवेगळ्या प्रकारचे मणी, फुल, थर्माकोलचे गोळे रंगाप्रमाणे वेगवेगळे करायला सांगा | मणी, फुल, थर्माकोल चे रंगीत गोळे | वर्गीकरण |
| ९ | पाटीवर / वहीवर एखादी रचना काढून द्या  याप्रमाणे पुढे त्याला पूर्ण करायला सांगा | पाटी, वही, पेन, पेन्सिल | आकृतिबंध |
| १० | दोन वाट्यांमध्ये, ताटलीमध्ये फुल, तांदूळ, डाळ, पाकळ्या (काहीही साहित्य चालेल) ते कमी - जास्त ठेवा व कोणते जास्त व कोणते कमी हे विचारा. | ताटली, वाट्या, फुल, तांदूळ, डाळ याप्रकारे घरातील साहित्य | कमी - जास्त संकल्पना |









| इयत्ता दुसरी – भाषा | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | कोणतेही चित्र घ्या आणि त्यात काय दिसत आहे त्यावरून १० वाक्ये मुलाला सांगायला सांगा. उदा– हत्ती पाणी पीत आहे, बागेत फुले आहेत, ससा गवत खात आहे याप्रमाणे | वर्तमानपत्र, पाठ्यपुस्तक, गोष्टीचे पुस्तक | चित्र वर्णन |
| २ | एखादे चित्र दाखवा व त्यावरून मुलाला जी गोष्ट सुचत आहे ती त्याला सांगायला सांगा | वर्तमानपत्र, पाठ्यपुस्तक, गोष्टीचे पुस्तक | गोष्ट तयार करणे, अभिव्यक्ती |
| ३ | एखादा विषय देऊन त्यावर मुलाला बोलायला सांगा उदा – माझी शाळा, माझा आवडता खेळ | – | अभिव्यक्ती |
| ४ | एखादे अपूर्ण वाक्य द्या व ते मुलाला पूर्ण करायला सांगा – **उदा:**<br>**१.** माझी शाळा मला आवडते कारण ...<br>**२.** मी गावाला जाताना ...<br>**३.** उद्या नळाला पाणी आले नाही तर ...<br>**४.** कोरोना संपल्यावर ...<br>**५.** शाळा बंद आहेत कारण ... | – | अभिव्यक्ती |
| ५ | घरात असणाऱ्या डाळींची यादी करायला सांगा. | – | आकलन |
| ६ | वर्तमान पत्रात शब्दांमध्ये दिसणाऱ्या (क, म, र) या अक्षरांना गोल करायला सांगा. | वर्तमानपत्र, पेन/ पेन्सिल | अक्षर ओळख |
| ७ | शब्द साखळी – शेवटच्या अक्षरावरून येणारा शब्द सांगायला सांगा. | – | शब्द संग्रहात वाढ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | (क, म, ब, अ, ग) या अक्षरावरून सुरु होणारे शब्द लिहायला सांगा. | पेन/पेन्सिल/वही | शब्द संग्रहात वाढ |
| ९ | ५ भाज्या, फळे, रंग, प्राणी यांची नावे लिहायला सांगा. | – | शब्द संग्रह व संकल्पना समज स्पष्टता |
| १० | घरात असणाऱ्या कडधान्यांची यादी मुलाला करायला सांगा. | – | आकलन |








| इयत्ता दुसरी – गणित | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | काडेपेटीतील काड्यांचे १० – १० चे गठ्ठे बनवायला सांगा. | काडेपेटी काड्या, रबर | दशक संकल्पना |
| २ | १ ते ३० यापैकी कोणताही अंक मुलाला सांगा व ते त्याला वहीत/ पाटीवर लिहून दाखवायला सांगा | वही /पाटी, पेन्सिल | अंक ओळख |
| ३ | पाटीवर/वहीवर त्रिकोण, चौकोन, आयत, चौरस, गोल हे आकार काढायला सांगा. | वही/पाटी, पेन्सिल | आकार ओळख |
| ४ | मुलाला कोणतेही आवडीचे चित्र काढायला सांगा व त्यात कोणते आकार काढले आहेत हे सांगायला सांगा | वही/पाटी, पेन्सिल | आकार ओळख |
| ५ | घरातील त्रिकोण, चौकोन, गोल आकाराच्या वस्तूंची यादी करायला सांगा. | वही/ पाटी, पेन्सिल | आकार ओळख |
| ६ | वाटीत काही मणी, बिया, खडे घ्या आणि त्यातील काही मुलाच्या हातात ठेवा आणि ते किती आहेत हे मोजून ती संख्या वहीवर किंवा पाटीवर लिहायला सांगा (१ ते ३० पर्यंत कोणतीही संख्या घ्या) | मणी, बिया, खडे, वही / पाटी, पेन्सिल | मोजणी व अंक लेखन |
| ७ | पाठ्यपुस्तकातील पाढ्यांच्या रकान्यातील १ ते ५० पैकी तुम्ही एका अंकावर बोट ठेवा व तो अंक मुलाला ओळखायला सांगा | गणिताचे पुस्तक | अंक ओळख |
| ८ | घरात १ ते १०, ११ ते २० अंक फरशीवर रांगेत लिहा व त्यावर मुलाला २ च्या टप्प्याने चालायला सांगा **उदा:** – १ – ४ – ७ –१० याप्रमाणे | खडू | टप्प्याने संख्या ओळख |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | कोणत्याही २ वस्तू संख्येत द्या आणि त्याची बेरीज किती होते ते विचारा<br>**१.** ४ वाट्या आणि + २ चमचे<br>**२.** २ गोट्या + १० मणी<br>**३.** ५ फुल + ८ चमचे | वाट्या, चमचे, मणी, बिया, गोट्या यासारख्या घरातील कोणत्याही वस्तू | बेरीज |
| १० | घरात १ ते १०, ११ ते २० अंक फरशीवर रांगेत लिहा व त्यावर मुलाला २ च्या टप्प्याने उलट चालायला सांगा<br>**उदा:** – १० – ७ – ४ – १ याप्रमाणे | खडू | टप्प्याने संख्या ओळख |







| इयत्ता तिसरी – भाषा | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | परिसरातील वेगवेगळी पाने गोळा करायला सांगा आणि त्याचे नाव, आकार, रंग याबद्दल मुलाला लिहायला सांगा. | वही, पेन्सिल | निरीक्षण |
| २ | कोणताही एखादा उतारा मुलाला द्या, वाचायला सांगा व त्यावर ५ प्रश्न तयार करायला सांगा. | गोष्टीचे पुस्तक, पाठ्यपुस्तक, वर्तमानपत्र | प्रश्न निर्मिती कौशल्य |
| ३ | मुलाला एखाद्या विषयावर १० ओळी लिहायला सांगा उदा– आवडणारा पदार्थ, पाऊस, आवडता सण, शेती इत्यादी | वही, पेन्सिल | अभिव्यक्ती |
| ४ | मुलाला एखादा उतारा वाचायला सांगा व त्यात त्याला काय समजले ते सांगायला सांगा (त्याच्या भाषेत) | गोष्टीचे पुस्तक, पाठ्यपुस्तक, वर्तमानपत्र | अभिव्यक्ती |
| ५ | घरात कोणालाही ५ प्रश्न विचारायला सांगा. | – | प्रश्न निर्मिती कौशल्य |
| ६ | एखादे चित्र दाखवा व त्यावर मुलाला सुचत असलेली गोष्ट सांगायला सांगा. | गोष्टीचे पुस्तक, पाठ्यपुस्तक, वर्तमान पत्र यातील कोणतेही चित्र | अभिव्यक्ती |
| ७ | मुलाला आपल्या गावाचे वर्णन करायला सांगा. (त्याच्या शब्दात) | वही, पेन्सिल | अभिव्यक्ती |
| ८ | मुलाला एखादा विषय सांगा उदा:– पाऊस, गणपती, शेत आणि यावर त्याला एखादी कविता तयार करायला सांगा. | वही, पेन्सिल | वर्णन, अभिव्यक्ती |
| ९ | परिसरातील खडे, काड्या, पाने, फुले इत्यादी साहित्य मुलाला गोळा करायला सांगून त्यातून त्याला हवे ते चित्र तयार करायला सांगा. | परिसरातील साहित्य | सृजनशीलता, निर्णय क्षमता |
| १० | परिसरातील वेगवेगळ्या औषधी वनस्पती शोधायला सांगा आणि त्याचे उपयोग लिहायला सांगा. | – | निरीक्षण, आकलन |


## इयत्ता तिसरी – गणित

| अनु. क्र. | उपक्रम / कृती | साहित्य | यातून मुल काय शिकणार आहे |
|---|---|---|---|
| १ | घरातील रांगोळी, पिठाच्या सहाय्याने मुलाला आयत, गोल, चौकोन, षटकोन, त्रिकोण आकार काढायला सांगा. | रांगोळी, पीठ | आकार |
| २ | मुलाला घरातील कपाट, टेबल, टीव्ही, वही, पाट याचे निरीक्षण करायला सांगा व त्याला किती कडा, कोपरे आहेत हे सांगायला सांगा. | | कडा, कोपरे संकल्पना |
| ३ | पुस्तकातील पाढ्यांच्या रकान्यातील १ ते १०० अंकापैकी कोणत्याही अंकावर बोट ठेवा व तो अंक मुलाला ओळखायला सांगा. | गणिताचे पुस्तक | अंक ओळख |
| ४ | मुलाला कोणताही १ अंक द्या आणि त्यापासून जास्तीत जास्त संख्या तयार करायला सांगा<br>**उदा:** – ९, ५, ३<br>**१.** ३५९ । **२.** ५९३<br>**३.** ९३५ । **४.** ५३९<br>याप्रमाणे जास्तीत जास्त संख्या मुलाने तयार करायच्या | पाटी, पेन्सिल, वही | संख्या तयार करणे संख्येचे स्थान |
| ५ | कोणत्याही ३ संख्या मुलाला द्या आणि त्याचा चढता आणि उतरता क्रम लावायला सांगा<br>**उदा: –** ५५, ४७, ६६<br>**चढता क्रम –** ४७, ५५, ६६<br>**उतरता क्रम –** ६६, ५५, ४७<br>याप्रमाणे | वही, पाटी, पेन्सिल | चढता, उतरता क्रम संकल्पना |
| ६ | मुलाला घरात एकूण किती व्यक्ती आहेत हे विचारा आणि प्रत्येकाला २ भाकरी जेवायला लागणार आहेत तर सर्व व्यक्तींना किती भाकरी लागतील हे विचारा. | | तार्किकता, बेरीज, गुणकार |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | मुलाच्या हातात काही फुले, मणी, बिया, दगड हातात द्या आणि घरात जितक्या व्यक्ती आहेत त्यांना समान वाटप करायला सांगा. | फुले, मणी, बिया, खडे | भागाकार संकल्पना सुरूवात |
| ८ | मुलाला कॅलेंडरवरची आजची तारीख व वार दाखवायला सांगा. | कॅलेंडर | दिनदर्शिका |
| ९ | मुलाला वाटी भरून रवा दे, अर्धी वाटी शेंगदाणे दे, ग्लास भर दुध दे याप्रमाणे सूचना सांगा व त्याप्रमाणे मुलाला कृती करायला सांगा. | रवा, शेंगदाणे, दुध, पाणी याप्रमाणे घरातील इतर वस्तू | विविध मोजमाप |
| १० | कंपासमधील छोट्या पट्टीने घरातील खिडकी, कपाट, पुस्तक यांची लांबी मोजायला सांगा. | पट्टी | लांबी संकल्पना |







| इयत्ता चौथी – भाषा | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र. | उपक्रम / कृती | साहित्य | यातून मुल काय शिकणार आहे |
| १ | मुलाला एखाद्या प्लास्टिकच्या भांड्यात, कुंडीत मेथी दाणे, धणे किंवा कोणत्याही बिया पेरायला सांगा, त्याला पाणी घालायला सांगा आणि दररोज त्यात काय बदल होत आहे हे बघायला सांगा आणि काय बदल त्याला दिसत आहे हे सांगायला सांगा किंवा लिहायला सांगा. | प्लास्टिकचे भांडे, कुंडी, बिया, दाणे | निरीक्षण, अभिव्यक्ती |
| २ | मुलाला प्रश्न विचारा– आपल्याला पाणी कोठून कोठून मिळते? आणि त्याचा वापर आपण कशासाठी करतो हे त्याला त्याच्या शब्दात सांगू द्या. | | निरीक्षण, अभिव्यक्ती, तार्किकता |
| ३ | मुलाला घरातील कोणाचीही मुलाखत घ्यायला सांगा– ५ प्रश्न विचारायला सांगा. | | प्रश्न निर्मिती कौशल्य |
| ४ | मुलाला वर्तमान पत्रातला कोणताही मजकूर वाचायला सांगा व तुला वाचून काय समजले हे त्याच्या भाषेत सांगायला सांगा. | वर्तमानपत्र | अभिव्यक्ती |
| ५ | मुलाला त्याच्या आईचे / बाबांचे / आजीचे वर्णन करायला सांगा. | | अभिव्यक्ती |
| ६ | गावातील सरपंचांची मुलाखत घ्यायची असेल तर तू काय प्रश्न विचारशील याची यादी मुलाला करायला सांगा. | वही, पेन्सिल | प्रश्न निर्मिती |
| ७ | मुलाला वेगवेगळ्या खेळांची यादी तयार करायला सांगा (घरातील, मैदानातील) | वही, पेन्सिल | निरीक्षण, आकलन |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | शाळेतल्या शिक्षकांची मुलाखत घ्यायची असेल तर तू काय प्रश्न विचारशील याची यादी मुलाला करायला सांगा. | वही, पेन्सिल | प्रश्न निर्मिती |
| ९ | मुलाला मातीपासून वेगवेगळ्या वस्तू/मूर्ती तयार करायला सांगा | घराजवळील माती | अभिव्यक्ती, कौशल्य |
| १० | घरात किराणा माल आणायचा आहे तर आईसोबत मुलाला यादी करायला सांगा | वही, पेन्सिल | निरीक्षण, आकलन, प्रश्न निर्मिती |







## इयत्ता चौथी – गणित

| अनु. क्र. | उपक्रम / कृती | साहित्य | यातून मुल काय शिकणार आहे |
|---|---|---|---|
| १ | मुलाला तुमच्यासोबत किराणा मालाची यादी तयार करायला सांगा व प्रत्येक वस्तूच्या पुढे अंदाजे त्याची किंमत लिहायला सांगा. | वही, पेन्सिल | अंदाज, तार्किकता |
| २ | घरात मुलाला काही बिया, खडे, फुले देऊन त्याची घरातील व्यक्तींमध्ये समान वाटणी करून बाकी, शिल्लक किती राहिले हे सांगायला सांगा. | बिया, खडे, मणी | भागाकार, बाकी |
| ३ | मुलाला पूर्ण भाकरी, चपातीचा अर्धा भाग, पावभाग, पाउण भाग दाखवायला सांगा. | भाकरी, चपाती | भाग, मापन |
| ४ | एका बादलीत किती तांबे पाणी मावते ही कृती त्याला करायला लावा व किती तांबे पाणी मावले हे विचारा. | पातेले, बादली, मग, ग्लास, तांब्या याप्रमाणे घरातील भांडी | मापन, तार्किकता |
| ५ | घड्याळात किती वाजले आहेत हे विचारा व त्याधारित काही अजून प्रश्न विचारा<br>**१.** अजून २ तासाने किती वाजणार आहेत?<br>**२.** ९ वाजायला अजून किती वेळ बाकी आहे? | घड्याळ | घड्याळ, तार्किकता |
| ६ | कोणतेही ४ / ५ अंक द्या व त्यापासून जास्तीत जास्त संख्या तयार करायला सांगा. | वही, पेन्सिल | संख्या तयार करणे |
| ७ | आणलेल्या किराणा मालातील वस्तूंमधील (MRP) वस्तूची किंमत कुठे लिहिली आहे हे दाखवायला सांगा. | वस्तू | व्यावहारिक ज्ञान |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | कॅलेंडर बघून या महिन्यात किती आठवडे आहेत, किती रविवार आहेत, कोणते सण आहेत हे सांगायला सांगा. | कॅलेंडर | दिनदर्शिका |
| ९ | १००, २०० रुपये नोटांचे सुट्ट्या रुपयात रुपांतर करायला सांगा. | नाणी, नोटा | सुट्टे, बंदे |
| १० | घरात जमिनीवर किती फरशा आहेत मोज. | | मोजणी, निरीक्षण |







| इयत्ता पाचवी – भाषा | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र. | उपक्रम / कृती | साहित्य | यातून मुल काय शिकणार आहे |
| १ | वाचलेल्या गोष्टीच्या पुस्तकातील कोणत्याही पात्राबद्दल त्याला काय वाटते ते सांगायला सांगा. | गोष्टीचे पुस्तक | अभिव्यक्ती, संवाद |
| २ | आज शाळेत तू काय केलेस? तुला आज जास्त काय करायला आवडले? मित्रांसोबत काय गप्पा मारल्यास? असे कोणतेही प्रश्न विचारून मुलाशी संवाद साधा. | – | घटनाक्रम, अभिव्यक्ती, संवाद |
| ३ | गावात फेरफटका मारून गावात भिंतीवर/ दुकानावर लावलेले बोर्ड वाचायला सांगा. | – | समजपूर्वक वाचन |
| ४ | कोणतेही ५ शब्द देऊन तोंडी गोष्ट तयार करायला सांगा/लिहायला सांगा. | वही/पेन/पेन्सिल | अभिव्यक्ती, वाक्यरचना, घटनाक्रम, व्याकरण, समजपूर्वक लेखन |
| ५ | वर्तमानपत्रातील कोडी सोडवायला सांगा. | वर्तमानपत्र | तर्क/अंदाज |
| ६ | वर्तमानपत्रातील कोणतेही एक कात्रण वाचायला सांगा आणि त्यातून मुलाला काय समजले हे त्याला त्याच्या शब्दात सांगायला सांगा. | वर्तमानपत्र | समजपूर्वक वाचन, अभिव्यक्ती |
| ७ | पोस्टकार्ड वर मामाला/काकाला/आजीला पत्र लिहायला सांगा. | पोस्टकार्ड | अभिव्यक्ती, समजपूर्वक लेखन, व्याकरण |
| ८ | टीव्हीवर पाहत असलेल्या मालिकेतील पात्राबाबत बोलायला सांगा. | – | अभिव्यक्ती |
| ९ | एखादे चित्र देऊन त्याबद्दल गोष्ट तयार करायला सांगा. | चित्र | अभिव्यक्ती, घटनाक्रम |
| १० | वर्तमानपत्रातील/अनौपचारिक पुस्तकातील उतारा वाचून प्रश्न तयार करायला सांगा. | वर्तमानपत्र/पुस्तक | प्रश्ननिर्मिती कौशल्य, संवाद |

| इयत्ता पाचवी – गणित | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उपक्रम / कृती** | **साहित्य** | **यातून मुल काय शिकणार आहे** |
| १ | घरातील किराणा साहित्याचा हिशोब लेखी/ तोंडी करायला सांगा. | वही/पेन | गणिती क्रियांचा व्यवहारात वापर |
| २ | घरातील बंद असलेल्या घड्याळाच्या काट्यांच्या आधारे विविध कोनांचे प्रकार दाखवून ओळखायला सांगा. | घरातील बंद पडलेले घड्याळ | विविध प्रकारचे कोन |
| ३ | मेजरिंग टेपच्या आधारे घरातील टेबल/कपाट/दरवाजा/खिडक्या यांची लांबी मोजायला सांगा. | मेजरिंग टेप | मापन |
| ४ | एखादी ठराविक रक्कम देऊन दुकानातून वस्तू आणायला सांगणे व झालेला खर्च/उरलेली रक्कम याबाबत सांगायला सांगा. | – | गणिती क्रियांचा व्यवहारात वापर |
| ५ | एक डझन केळी म्हणजे किती? अर्धा किलो साखर म्हणजे किती? एक लिटर दुध म्हणजे किती? पावशेर भाजी म्हणजे किती? असे व्यावहारिक प्रश्न मुलाला विचारा. | – | मापन |
| ६ | १००० रुपये तुला दिले तर बाजारात जाऊन तू काय-काय खरेदी करशील? त्या वस्तूंची किंमत साधारण किती असेल? तुला पुरतील का यातील पैसे? की अजून लागतील असे प्रश्न विचारून मुलाला अंदाज वर्तविण्यास सांगा. | – | तर्क/अंदाज |
| ७ | कॅलेंडरमधील कोणत्याही दोन/ तीन संख्या मुलाला सांगा व त्या एकमेकात मिळविण्यास किंवा एकमेकातून वजा करण्यास सांगा. | कॅलेंडर | बेरीज/वजाबाकी |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | कॅलेंडरमधील कोणत्याही दोन संख्या मुलाला  सांगा व त्यांचा गुणाकार करण्यास सांगा. | कॅलेंडर | गुणाकार |
| ९ | पत्त्यांच्या कॅटमधील कोणतेही दोन पत्ते घेऊन त्यावरील अंकांचा गुणाकार/बेरीज/वजाबाकी या क्रिया करायला मुलाला सांगा. | पत्त्यांच्या कॅट | बेरीज/वजाबाकी/ गुणाकार |
| १० | कॅलेंडरमधील कोणत्याही दोन संख्या मुलाला सांगा व त्यांचा भागाकार करण्यास सांगा. | – | भागाकार |












## तुम्हाला सुचलेले उपक्रम लिहा

gyan prakash FOUNDATION

The Collaborators for Transforming Education

EdelGive Foundation

**ग्यानप्रकाश फाउंडेशन :** ब्रम्हनाद, बंगला क्र. १९, सिंध कोऑपरेटिव सोसायटी,
बाणेर रोड, औंध, पुणे – ४११००७ । इमेल–admin@gyanprakash.org